**नियमित दिवाणी दावा ५६/२०१७**

MHAH210003372017

**<u>निशाणी ३० खालील आदेश</u>**
**(ज्ञानदेव निंबाळकर वि. मोहन निंबाळकर)**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज निशाणी २६ व २८ वरील झालेल्या आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम भरणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, त्यांना काही कारणास्तव निशाणी २६ व २८ वरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम भरणे मुदतीत शक्य झाले नाही. सबब, त्यांना निशाणी २६ व २८ वरील आदेशाप्रमाणे कॉस्ट भरण्यास परवानगी मिळावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

२. वादी यांनी विरोध करुन असे म्हणणे दिले आहे की, प्रतिवादीने न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले नाहीत. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. अर्जाचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर असणे गरजेचे असल्याने मी खालील आदेश पारीत करत आहे –

| **आदेश** | |
|---|---|
| १. | अर्ज निशाणी ३० मंजुर करण्यात येतो. |
| २. | अर्ज निशाणी २६ व २८ वरील आदेशाप्रमाणे कॉस्टची रक्कम भरण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.04.21 17:30:36 +0530

**( यु. ए. भोसले )**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
**<u>जामखेड</u>**

दिनांक– २१/०४/२०२६
ठिकाण – जामखेड